देवस्थान व्यवस्थापन समिति
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

क्र. देव वशि जा.११eく/२०२४ दिनांक - 10 JUL 2024

## दरपत्रक मागणी सुचना (व्दीतीय मागणी)

**श्री करवीर निवासिनी (श्री महालक्ष्मी/श्री अंबाबाई) मंदिराकडील दरवाजे व रथ करणे कामी तयार झालेला लाकडाचा भुस्सा व विनावापर असलेले लाकडाचे तुकडे निर्गत करणे कामी दरपत्रक देणे बाबत**

श्री करवीर निवासिनी (श्री महालक्ष्मी/श्री अंबाबाई) मंदिराकडील दरवाजे व रथ नव्याने तयार करणेत आला आहे. सदर दरवाजे व रथ तयार करत असताना लाकडाचे काम करत असताना लाकुड घासकामामध्ये भुस्सा तयार झाला असुन सदर भुस्सा हा श्री त्र्यंबोली मंदिरकडील हॉलमध्ये ठेवणेत आला आहे. सदर भुस्सा हा उपयोगात येणार नसलेने त्याची निर्गत करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामामध्ये काही वापरात न येणारे लाकडाचे तुकडे देखील तसेच पडुन असुन त्याची देखील निर्गत करणे आवश्यक आहे. सदर भुस्सा व विनावापर असलेले लाकडाचे तुकडे विकत घेवून जाणेस तयार असलेस खालील मसुद्याप्रमाणे दर देणेत यावेत.

| क्र. | कामाचा तपशील | दर एकत्रित (सर्व करासहित व वाहतुकीसह) |
|---|---|---|
| १ | श्री करवीर निवासिनी (श्री महालक्ष्मी/श्री अंबाबाई) मंदिराकडील दरवाजे व रथ नव्याने तयार करणेत आला आहे. सदर दरवाजे व रथ तयार करत असताना लाकडाचे काम करत असताना लाकुड घासकामामध्ये तयार झालेला भुस्सा व लाकडाचे तुकडे श्री त्र्यंबोली मंदिरकडील हॉलमध्ये ठेवणेत आला आहे. सदर भुस्सा व वापरात न येणारे लाकडाचे तुकडे जागेवरुन आहे त्या स्थितीमध्ये स्वखर्चाने वाहतूक करुन घेवून जाणे | रु. /- |

वरील प्रमाणे कामांकरीता लेटरपॅड वर सिलबंद दरपत्रक या कार्यालयाकडे दि. १५/०७/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपुर्वी पोहोच करणेत यावे. सदर सिलबंद दरपत्रकावर विषय, दरपत्रक देणा-यांचे नाव व संपर्क नंबर नमुद करावा. दरपत्रकासोबत पॅन कार्डची प्रत देणेत यावी

अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. सदर विक्री करणेत येणा-या साहित्याची समक्ष जागेवर तपासणी करुनच दरपत्रक देणेचे आहे.
२. सदर कामी या कार्यालयाकडील प्रतिनीधी सोबत पाहणी करुन आवश्यक माहिती घेवून दर नमुद करणेचा आहे.
३. सदर दरपत्रकामध्ये नमुद करणेत येणारे दर हे सर्व करासहित, सर्व आवश्यक साहित्य व वाहतुक खर्चासहित देणेचे आहेत.
४. दरपत्रक मंजूर झालेले दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दर कमी केले जाणार नाहीत.
५. सदर कामाची ऑर्डर मिळताच सुचनेप्रमाणे साहित्य घेवून जाणेचे आहे.
६. दिले मुदतीमध्ये दरपत्रक प्राप्त न झालेस स्विकारले जाणार नाही.

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

प्रत -
१) कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी
२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी
३) स्थानिक मंदिराच्या नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी